**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे ४११ ००१

श्री. रघुनाथ सावळा जाधव — अपीलकर्ता
अनमोल, १३, कारंजकर उपनगर, गोडोलीचे
दक्षिणेस जुना हायवे लगत, सातारा शहर,
जि. सातारा

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी ,
जिल्हा परिषद, सातारा — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत),
जिल्हा परिषद, सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ५४९ / सातारा |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१८.३.२००९ |
| ३ | **उपस्थित** | |
| | **अपीलकर्ता** | श्री. रघुनाथ सावळा जाधव<br>अनमोल, १३, कारंजकर उपनगर, गोडोलीचे<br>दक्षिणेस जुना हायवे लगत, सातारा शहर,<br>जि. सातारा |
| | माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

**विवेचन**

आपण केलेल्या मागणीनुसार सरपंच, ग्रामपंचायत कुमठे, ता. सातारा यांच्या विरूध्दच्या फौजदारी गुन्ह्याबाबतची चौकशी करून अहवाल सादर केला नाही. गावठाणातील रस्त्याबाबतच्या ठरावाची, तसेच आपण केलेल्या विविध मागण्यांच्या अर्जावर कार्यवाही केली जात नाही व त्याबाबतची माहिती दिली जात नाही, अशी तक्रार अपीलकर्ता श्री. रघुनाथ सावळा जाधव यांनी केली.

श्री. जाधव विविध स्वरूपाचे अर्ज करीत असतात. अशा अनेक अर्जांचे संदर्भ देऊन वेगवेगळ्या विभागांकडील माहिती त्यांनी मागितली. ग्रामपंचायतीकडील माहिती अर्ज वर्ग करून त्यांना देण्यात आली व आपल्या कार्यालयाकडील माहिती विहित मुदतीत समक्ष दिली. 'मिळकत वाटप पत्राची मूळ प्रत मिळावी' इथपासून 'बंद केलेला रस्ता सुरु करावा' इथपर्यंत विविध स्वरूपाच्या प्रशासकीय कार्यवाहीच्या मागण्या त्यांनी अर्जात व अपिलात केल्या आहेत, असे प्रतिपादन अपिलीय प्राधिकारी तथा अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सातारा श्री. अंकुश ह. बगाटे यांनी केले.

उभय बाजूंनी सादर केलेली कागदपत्रे पाहता अपिलीय प्राधिकारी तथा अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सातारा यांचे प्रतिपादन रास्त आहे. श्री. जाधव यांनी विविध विषयांवर भाष्य केले असून, प्रशासकीय कार्यवाहीच्या अनेक मागण्या केल्या आहेत. तसेच विविध पातळ्यांवर वेळोवेळी दिलेल्या अर्जांचा संदर्भ देऊन मते व मागण्या नोंदविल्यामुळे माहितीच्या मागणीत नेमकेपणा आढळत नाही. त्यांनी माहिती नेमकेपणाने मागावी, अशी समज त्यांना देण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**पुणे**
**दि. २१.१२.२००९**

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे ४११ ००१

अपीलकर्ता

श्री. रशिद उस्मान शेख
रा. आशियाना बंगला, प्लॉट नं.७७, सुंदर पार्क
जवळ, कोतवले मळा, जुना कुपवाड रोड,
सांगली

**विरुध्द**

उत्तरवादी

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, मिरज, जि. सागली

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार, मिरज, जि. सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ५५३ + ५५९ / सांगली |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २८.१०.२००९ |
| ३ | **उपस्थित** | |

**अपीलकर्ता** श्री. रशिद उस्मान शेख
रा. आशियाना बंगला, प्लॉट नं.७७, सुंदर पार्क
जवळ, कोतवले मळा, जुना कुपवाड रोड, सांगली

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार, तहसील कार्यालय
मिरज, जि. सांगली श्री. डी. एस. कुंभार

| अपील क्रमांक | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | प्रथम अपिलाची तारीख | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख |
|---|---|---|---|---|
| ५५३ / सांगली | १०.१२.२००७ | -- | १०.१.२००८ | -- |
| ५५९ / सांगली | २०.१२.२००७ | -- | २९.१.२००८ | -- |

माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे.

## विवेचन

जन माहिती अधिकारी तथा मंडल अधिकारी, सांगली यांनी दिलेल्या माहिती विरूध्द अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, मिरज, जि. सांगली यांच्याकडे आपण केलेल्या अर्जाची प्रत व जिल्हाधिकारी कार्यालयात आपण दिलेले पत्र जिल्हाधिकारी कार्यालयाने तहसील कार्यालय, मिरज यांच्याकडे पाठविले. त्याची तारीख व प्रत आदी माहिती आपण मागितली होती. परंतु जन माहिती अधिकाऱ्यांनी विहित मुदतीत उत्तर दिले नाही. अपिलीय प्राधिकाऱ्यांनी सुनावणी घेतली नाही. 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'च्या वेळी काही माहिती देण्यात आली व ऊर्वरित माहिती दि. ११.११.२००८ - पूर्वी देण्यात येईल, असे प्रपत्रात नमूद करुनही त्यानुसार कार्यवाही केली नाही, म्हणून त्यांच्यावर दंडात्मक कारवाई करावी, अशी मागणी अपीलकर्ता श्री. रशिद उस्मान शेख यांनी केली.

तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार, मिरज श्री. मदन जोशी हे निवृत्त झाले असून अपील क्र.५५३ मधील मुद्दा (ब) मधील दि. २२.४.२००७ रोजी दिलेल्या विनंती अर्जाची झेरॉक्स प्रत सोडून इतर सर्व माहिती दिली आहे. सदरचे पत्राची प्रत दि. ११.११.२००८ पूर्वी देणेचे मान्य करणेत आले होते. तसेच अपील क्र.५५९ मधील पूर्ण माहिती दि. ११.११.२००८ पूर्वी देणेचे मान्य करणेत आले होते. परंतु या कार्यालयातील टपाल लिपिक व जमीन/जमाबंदी लिपिकाकडून सदरच्या पत्राची चौकशी केली असता ते पत्र या कार्यालयात आढळून येत नाही, असे दि. १०.११.२००८ च्या पत्रान्वये श्री. शेख यांना कळविण्यात आले. मात्र अपीलकर्त्याचा मूळ प्रश्न बिनशेती कर आकारणी-बद्दलचा होता व तो त्यांच्या मागणीनुसार सोडविण्यात आला आहे, असे प्रतिपादन विद्यमान जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, मिरज श्री. डी. एस. कुंभार यांनी केले.

स्वतः दिलेल्या अर्जाच्या प्रती श्री. शेख यांनी मागितल्या आहेत. माहिती देण्यास झालेल्या विलंबाबाबत तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार श्री. मदन जोशी यांनी व अपिलाबाबत विहित मुदतीत कार्यवाही न करण्याबाबत तत्कालीन अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार श्रीमती वैशाली जाधव (सध्या तहसीलदार वाई, जि. सातारा ) यांनी १५ दिवसांत आयोगास खुलासा सादर करण्याचा आदेश अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, मिरज डॉ. विकास खरात यांनी त्यांना कळवावा असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी दि. २९.१०.२००९ च्या पत्रान्वये सौ. वैशाली चव्हाण-जाधव व श्री. मदन ल. जोशी यांना आयोगाचे आदेश कळविले. श्री. जोशी यांनी दि. ६.११.२००९ च्या पत्रान्वये खुलासा सादर केला. अपुरा कर्मचारी वर्ग, जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार या

मूळ पदाव्यतिरिक्त, निवडणूक नायब तहसीलदार व संजय गांधी नायब तहसीलदार या पदांचा अतिरिक्त कार्यभार, त्याच काळात सांगलीमध्ये असलेले अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन व त्याच्या उद्‌घाटनासाठी राष्ट्रपती, अन्य महत्त्वाच्या व अति महत्त्वाच्या अतिथींचे दौरे आदी कामामुळे विलंब झाला. सर्व लिपिकांचे कार्यविवरण तपासले असता त्यांच्याकडेही पत्र मिळून आले नाही, असे श्री. जोशी यांनी खुलाशात नमूद केले आहे. त्यांचा खुलासा लक्षात घेऊन विलंबाबाबत दंडात्मक कारवाई न करण्याची त्यांची विनंती मान्य करण्यात येत आहे. चार स्मरणपत्रे देऊनही तत्कालीन अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार श्रीमती चव्हाण यांचा खुलासा आयोगास प्राप्त झालेला नाही, ही बाब गंभीर आहे. या संदर्भात महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम, १९७९ अन्वये शिस्तभंगाची कारवाई करणे आवश्यक आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

१. अपिले निकाली काढण्यात येत आहेत.

२. आयोगाच्या आदेशानुसार अहवाल सादर न करण्याबद्दल तत्कालीन अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, मिरज श्रीमती वैशाली जाधव-चव्हाण यांच्यावर महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम, १९७९ अन्वये शिस्तभंगाची कारवाई जिल्हाधिकारी सातारा यांनी करुन त्याबाबतचा पूर्तता अहवाल आयोगास दि. ३०.१.२०१० पर्यंत सादर करावा.

पुणे
दि. २८.१२.२००९

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.सदाशिव सखाराम पोवार
२६५१, डी, डांगे गल्ली, कोल्हापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपआयुक्त,
कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक संचालक, नगररचना,
कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ५५६ / कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१९.३.२००९ |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपआयुक्त,
कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर श्री.गणेश देशमुख

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक संचालक, नगररचना,
कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर श्री.मधुकर देवडे

उभय बाजूंनी सादर केलेली कागदपत्रे पाहता जन माहिती अधिकाऱ्यांनी केलेली कृती योग्य असून अपिलीय प्राधिकारी तथा उपआयुक्त, कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर श्री.गणेश देशमुख यांनी दिलेला निर्णय योग्य आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

(१) अपील अमान्य करण्यात येत आहे.

(२) अपिलीय प्राधिकारी तथा उपआयुक्त, कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर यांनी दिलेला निर्णय कायम करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र * पुणे खंडपीठ *

**पुणे**
**दि.१६.१२.२००९**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.सदाशिव सखाराम पोवार
२६५१ डी, डांगे गल्ली, कोल्हापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपआयुक्त,
कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर — उत्तरवादी

**जना माहिती अधिकारी** तथा उप-शहर अभियंता, वि.का.क्र.२,
कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ५५७ / कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२८.४.२००९ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.सदाशिव सखाराम पोवार
२६५१ डी, डांगे गल्ली, कोल्हापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपआयुक्त,
कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर श्री.गणेश देशमुख

**जना माहिती अधिकारी** तथा उप-शहर अभियंता, वि.का.क्र.२,
कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर
विद्यमान-श्री.एस.के.माने, तत्कालीन-श्री.एन.एस.सरनोबत

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.१२.९.२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ६.१०.२००८ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २३.९.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-यांनी निर्णय दिल्याची तारीख | दि. १६.१०.२००८ |
| ८ | माहिती-मागणीच्या अर्जाची (जोडपत्र अ) प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.७.२.२००९ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांमध्ये एकमत न झाल्याने दि.२८.४.२००९ रोजी सुनावणी घेण्यात आली.

महाराष्ट्र राज्य वीज मंडळाच्या सबस्टेशनच्या इमारतीबाबत बांधकाम परवाना दिला नसल्याचे जन माहिती अधिकारी तथा उप-शहर अभियंता, वि.का.क्र.२, कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर यांनी कळविले. परंतु जागेवर इमारत उभी असून फाळा लागू केला आहे व भोगवटादारांच्या यादीत नाव आहे. सबस्टेशनसाठी ही जागा देताना कोल्हापूर महानगरपालिकेने मूळ मालकाची परवानगी घेतलेली नाही, अशी तक्रार अपीलकर्ता श्री.सदाशिव सखाराम पोवार यांनी केली.

संबंधित जागेवर वीज मंडळाचे सबस्टेशन आहे. डी.सी.रूलप्रमाणे वीजमंडळ सबस्टेशनसाठी बांधकाम परवान्याची आवश्यकता नसते, याबाबतची माहिती श्री.पोवार यांना देण्यात आली आहे. हे बांधकाम पाडण्याची मागणी त्यांनी विशेष अपील निर्गत कार्यक्रमाच्या वेळी केली. परंतु ती बाब माहितीच्या अधिकारात येत नाही, असे निवेदन जन माहिती अधिकारी तथा उप-शहर अभियंता, वि.का.क्र.२, कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर श्री.एस.के.माने यांनी केले. शासकीय संस्थांना विकास शुल्क लागू नसल्याचा खुलासा अपिलीय प्राधिकारी तथा उपआयुक्त, कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर श्री.गणेश देशमुख यांनी केला.

जन माहिती अधिकारी तथा उप-शहर अभियंता, वि.का.क्र.२, कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर यांनी केलेल्या निवेदनानुसार लेखी स्वरूपात श्री.पोवार यांना ही माहिती द्यावी, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार जन माहिती अधिकारी तथा उप-शहर अभियंता, वि.का.क्र.२, कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर श्री.एस.के.माने यांनी दि.२९.६.२००९ च्या पत्रान्वये वीज मंडळाला बांधकामाबाबत परवानगी घेण्याची आवश्यकता नसल्याची नियमावलीतील तरतूद नियमावलीच्या प्रतीसह श्री.पोवार यांना कळविली. तथापी नियमावलीतील काही भाग लपवून ठेवून नियम कोणत्या कारणासाठी लागू होतो, याबाबतची प्राथमिक विश्लेषणातील माहिती लपवून ठेवली आहे, म्हणून त्यांच्यावर कारवाई व्हावी, अशी मागणी श्री.पोवार यांनी दि.१.७.२००९ च्या पत्रान्वये आयोगाकडे केली. तथापि ही बाब माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे**
**दि.२१.१२.२००९**

(राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ)

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.आनंदा श्रीपती पाटील
मु.सोनुर्ले, पो.नांदगाव, ता.शाहूवाडी, जि.कोल्हापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अधीक्षक, भूमी अभिलेख,
कोल्हापूर, जि.कोल्हापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा तालुका निरीक्षक भूमी अभिलेख, शाहूवाडी,
कोल्हापूर, जि.कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ५६६ / कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१९.३.२००९ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.आनंदा श्रीपती पाटील
मु.सोनुर्ले, पो.नांदगाव, ता.शाहूवाडी, जि.कोल्हापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा अधीक्षक, भूमी अभिलेख,
कोल्हापूर, जि.कोल्हापूर श्री.मि.ना.चव्हाण

**जन माहिती अधिकारी** तथा तालुका निरीक्षक भूमी अभिलेख, शाहूवाडी
कोल्हापूर, जि.कोल्हापूर श्री.पी.बी.माने

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २०.८.२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १०.९.२००८ |

| | | |
|---|---|---|
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १२.९.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-यांनी निर्णय दिल्याची तारीख | दि. १३.१०.२००८ |
| ८ | माहिती-मागणीच्या अर्जाची (जोडपत्र अ) प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.७.२.२००९ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी अपीलकर्ता गैरहजर राहिल्याने दि.१९.३.२००९ रोजी सुनावणी घेण्यात आली. अपीलकर्ता हे सुनावणीलाही गैरहजर होते.

सन १९७२ मधील गुणाकार बुकाची नक्कल आपल्याला देण्यात आली नाही. अभिलेख पुन्हा शोध घेऊन माहिती द्यावी व नियमानुसार कागदपत्रे जतन केली नसल्यास संबंधितांविरूध्द तालुका निरीक्षक भूमी अभिलेख, शाहूवाडी, ता.शाहूवाडी, जि.कोल्हापूर यांनी पोलीस ठाण्यात तक्रार नोंदवावी, असे आदेश अपिलीय प्राधिकारी तथा अधीक्षक, भूमी अभिलेख, कोल्हापूर यांनी दिल्यानंतरही तालुका निरीक्षक, भूमी अभिलेख, शाहूवाडी यांनी माहिती दिली नाही. 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'च्या वेळी आपल्याला सन १९७९ ची कमी-जास्त पत्रकाची नक्कल देण्यात आली, असे प्रतिपादन अपीलकर्ता श्री.आनंदा श्रीपती पाटील यांनी केले.

अपिलीय प्राधिकाऱ्यांनी दिलेल्या निर्णयानुसार काही कागदपत्रांच्या प्रती 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'च्या वेळी श्री.पाटील यांनी स्वीकारल्या. मात्र नकाशाची नक्कल स्वीकारण्यास नकार दिला. भू-संपादन प्रकरणी गुणाकार बुक अभिलेख तयार करण्यात येत नसल्यामुळे त्याची नक्कल देता येणार नाही, असे त्यांना स्पष्ट करण्यात आले आहे. तसेच प्रकरणातील मूळ अभिलेख दाखविण्याची तयारीही दर्शविली, असे निवेदन जन माहिती अधिकारी तथा तालुका निरीक्षक, भूमी अभिलेख, शाहूवाडी, ता.शाहूवाडी, जि.कोल्हापूर श्री.पी.बी.माने यानी केले.

सहमतीने जमीन वाटप केल्यासच गुणाकार बुक तयार होते. या प्रकरणी जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशाप्रमाणे कमी-जास्त पत्रक तयार होणे, त्याची नक्कल व उपलब्ध नकाशाची नक्कल आदि सर्व कागदपत्रे पुरविण्याचा प्रयत्न जन माहिती अधिकाऱ्यांनी केलेला

आहे, असे प्रतिपादन अपिलीय प्राधिकारी तथा अधीक्षक, भूमी अभिलेख, कोल्हापूर श्री.मि.ना.चव्हाण यांनी केले.

उभय बाजूंची निवेदने लक्षात घेता, नसलेल्या अभिलेखांच्या नकलेची मागणी अपीलकर्ता करीत आहेत, ती योग्य नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**पुणे**
**दि.२१.१२.२००९**

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.चंद्रकांत बाबूराव मिरजकर
प्लॉट नं.४०, दत्तमंदीराजवळ, गव्हर्मेंट कॉलनी,
विश्रामबाग,जि. सांगली **अपीलकर्ता**

विरुध्द

१) **अपिलीय प्राधिकारी तथा** उप सचिव,
शालेय शिक्षण व क्रिडा, मंत्रालय, मुंबई-३२ (अपील ५६९)

२) **अपिलीय प्राधिकारी तथा** शिक्षण उपसंचालक,(अपील ५६८)
शिक्षण उपसंचालक यांचे कार्यालय,सोमवार पेठ,
गंजी गल्ली, जि.कोल्हापूर **उत्तरवादी**

**१) जन माहिती अधिकारी तथा** अवर सचिव,
शालेय शिक्षण व क्रिडा, मंत्रालय, मुंबई-३२(अपील ५६९)

**२) जन माहिती अधिकारी,**
शिक्षण उपसंचालक यांचे कार्यालय,सोमवार पेठ,
गंजी गल्ली, जि.कोल्हापूर (अपील ५६८)

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ५६८+५६९/सांगली |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२०.११.२००९ व १८.११.२००९ |
| ३. | उपस्थित<br>**अपीलकर्ता-** श्री.चंद्रकांत बाबूराव मिरजकर<br>प्लॉट नं.४०, दत्तमंदीराजवळ, गव्हर्मेंट कॉलनी,<br>विश्रामबाग,जि. सांगली<br><br>**अपिलीय प्राधिकारी तथा** शिक्षण उपसंचालक,(अपील ५६८)<br>शिक्षण उपसंचालक यांचे कार्यालय,सोमवार पेठ,<br>गंजी गल्ली, जि.कोल्हापूर श्री.डी.एम.पाटील<br><br>**जन माहिती अधिकारी,**<br>शिक्षण उपसंचालक यांचे कार्यालय,सोमवार पेठ,<br>गंजी गल्ली. जि.कोल्हापूर श्री.एच.एस.नांगरे पाटील (अपील ५६८) | |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.२७.०८.२००७,दि. ०५.०९.२००७ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.- दि.०८.१०.२००७ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि.१५.१२.२००७, दि.१५.१२.२००७ |

| | | |
|---|---|---|
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.१४.०२.२००८, दि.०२.०२.२००८ |
| ८ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

अर्हताकारी सेवेबाबत आपण मागितलेली माहिती जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांच्या पातळीवरुन अपुरी देण्यात आली. प्रशिक्षण कालावधीच्या संदर्भात चुकीची कार्यवाही केली असून शासनाचा आदेश घेऊन प्रकरण निकाली काढणे आवश्यक होते. अशा प्रकारची चुकीची कार्यवाही करुनही त्याबाबत योग्य तो खुलासाही केलेला नाही, असे प्रतिपादन अपीलकर्ता श्री.चंद्रकांत बाबूराव मिरजकर यांनी केले.

सेवापूर्वक प्रशिक्षण कालावधी अर्हताकारी सेवा म्हणून निवृत्तीवेतनासाठी हिशोबात धरावा, अशी सौ.चंद्रसेना चंद्रकांत मिरजकर यांची मागणी होती. ती अमान्य करण्यात आल्याचे वेळोवेळी त्यांना कळविण्यात आले. तसेच मागणीनुसार सर्व कागदपत्रांच्या सत्य प्रती श्री.मिरजकर यांना देण्यात आल्या. तरीही पुन्हा पुन्हा त्याच मागणीसाठी श्री.मिरजकर विविध पातळ्यांवर अर्ज व अपिले करत आहेत, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी,शिक्षण उपसंचालक यांचे कार्यालय,सोमवार पेठ,गंजी गल्ली, जि.कोल्हापूर श्री.एच.एस.नांगरे पाटील व अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षण उपसंचालक, शिक्षण उपसंचालक यांचे कार्यालय,सोमवार पेठ,गंजी गल्ली, जि.कोल्हापूर श्री.डी.एम.पाटील यांनी पूरक कागदपत्रांसह केले.

अपीलकर्त्यास माहिती देण्यात आली असून प्रशासकीय कार्यवाहीविषयीचे त्यांचे आक्षेप माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ अंतर्गत निर्णयार्थ येत नाहीत. सबब आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपिले अमान्य.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

पुणे
दिनांक : २९/१२/२००९

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१.

श्री. बंडोपंत मायाप्पा ढेंबरे
मु.राजोबाचीवाडी, पो.माडग्याळ,
ता.जत, जिल्हा सांगली

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

अपिलीय प्राधिकारी तथा
उप मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, सांगली

**उत्तरवादी**

जन माहिती अधिकारी तथा अध्यक्ष / ग्रामसेवक,
ग्राम जलस्वराज्य प्रकल्प व्हसपेठ, ग्रामपंचायत व्हसपेठ,
ता.जत, जिल्हा सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ५९० / सांगली |
| २ | सुनावणीचा दिनांक | २३/६/२००९ |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सांगली
श्री.एम.आर.पाटील

**जन माहिती अधिकारी** तथा ग्रामसेवक/अध्यक्ष, जलस्वराज्य प्रकल्प व्हसपेठ,
ग्रामपंचायत,व्हसपेठ, ता.जत, जिल्हा सांगली
श्री.मुसा अली नदाफ

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.५/११/२००७ |

| | | |
|---|---|---|
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ३१/१२/२००७ |
| ६ | प्रथम अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २७/१/२००८ |
| ७ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती :-** माहिती-मागणी अर्जाची (जोडपत्र अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

अपीलकर्ता श्री बंडोपंत मायाप्पा ढेंबरे यांनी मौजे व्हसपेठ, ता.जत या गावाच्या जलस्वराज्य प्रकल्पाबाबत एकूण १० मुद्दयांची माहिती मागितली होती . प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपीलकर्त्याने आयोगाकडे अपील केले आहे.

राज्य माहिती आयोगाने दि. २१.१०.२००८ रोजी आयोजित केलेल्या ''विशेष अपील निर्गत कार्यक्रमा' मध्ये या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांमध्ये एकमत न झाल्याने दि. २३.६.२००९ रोजी सुनावणी घेण्यात आली

अपीलकर्त्याचे निधन झाल्याचे जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी सांगितले. याबाबतचे प्रमाणपत्र सादर करण्याबाबत आयोगाने आदेश दिले . त्यानुसार जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत सोन्याळ, ता.जत, जिल्हा सांगली यांनी अपीलकर्त्याचा मृत्यूदाखला दि. २/१२/२००९ रोजी आयोगास सादर केला.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि.१८-१२-२००९**

**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे ४११ ००१

श्री. श्रीरंग भाऊ थोरात
मु.पो.कार्वे, ता.कराड, जि.सातारा — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उप निबंधक, सहकारी संस्था, कराड, जि. सातारा — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सचीव, धानाई सहकारी उपसा जलसिंचन योजना
सहकारी संस्था मर्या., कार्वे, ता. कराड

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ५११ / सातारा |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १६.४.२००९ |

३ **उपस्थित**

**अपीलकर्ता** — श्री. श्रीरंग भाऊ थोरात
मु.पो.कार्वे, ता.कराड, जि.सातारा

**अपिलीय प्राधिकारी** तथा — उप निबंधक, सहकारी संस्था, कराड, जि. सातारा
श्री. एम.वाय. कदम

**जन माहिती अधिकारी** तथा — सचीव, धानाई सहकारी उपसा जलसिंचन योजना
सहकारी संस्था मर्या., कार्वे, ता. कराड
श्री. युसूफ गणी मुजावर

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १०.११.२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १.१२.२००८ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १०.१२.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ७.१.२००९ |

८ माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे.

## विवेचन

आपण मागितलेली माहिती विहित मुदतीत न देता 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'च्या वेळी (आज) दिली. वेगवेगळ्या वेळी दिशाभूल करणारी व विलंबाने माहिती दिल्याबद्दल संबंधितांना शास्ती व्हावी, अशी मागणी अपीलकर्ता श्री. श्रीरंग भाऊ थोरात यांनी केली.

आपल्या संस्थेला कोणतेही शासकीय अनुदान मिळत नाही. तसे पत्रही उप निबंधक, सहकारी संस्था, कराड, जि. सातारा यांना दिले आहे. त्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ संस्थेला लागू होत नाही, अशी संस्थेची भूमिका आहे. तथापि संस्थेला माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ लागू होतो व माहिती द्यावी, असा आदेश अपिलीय प्राधिकारी तथा उप निबंधक, सहकारी संस्था, कराड, जि. सातारा यांनी दिल्यानंतर श्री. थोरात यांना माहिती घेण्याबाबत कळविले. परंतु त्यांनी शुल्क भरले नाही, तरीही आता माहिती दिली, असे जन माहिती अधिकारी तथा सचीव, धानाई सहकारी उपसा जलसिंचन योजना सहकारी संस्था मर्या., कार्वे, ता. कराड श्री. युसूफ गणी मुजावर यांनी नमूद केले.

प्रथम अपिलाची सुनावणी आपल्यापुढे झाली तेव्हा संस्थेला भू-विकास बँकेमार्फत सवलती मिळत असल्याचे नमूद करण्यात आले. सातारा जिल्हा कृषि ग्रामीण विकास बहुउद्देशीय विकास बँक मर्या., सातारा यांच्याकडून संस्थेला अनुदान मिळत असल्याचे नमूद करून आपण माहिती देण्याबाबतचे आदेश दिले, असे प्रतिपादन अपिलीय प्राधिकारी तथा उप निबंधक, सहकारी संस्था, कराड, जि. सातारा श्री. एम. वाय. कदम यांनी केले.

अपिलीय प्राधिकाऱ्यांचा निर्णय लक्षात घेता संस्थेने अपीलकर्त्यास माहिती देणे आवश्यक असून त्यांनी शुल्क भरून माहिती घ्यावी, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे**
**दि. २१.१२.२००९**

(स्वाक्षरी, शिक्का: राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ)

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -४११ ००१

श्री.सिध्दार्थ भगवान बनसोडे
मु.पो.पिंपळी, ता.बारामती,जि.पुणे — **अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** जिल्हाधिकारी,
जिल्हाधिकारी कार्यालय पुणे, पुणे-१ — **उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा** उप विभागीय अधिकारी,
बारामती उपविभाग, बारामती, ता.बारामती,जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ६०७/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२७.११.२००८ |
| ३. | उपस्थित<br>**अपिलीय प्राधिकारी तथा** जिल्हाधिकारी,<br>जिल्हाधिकारी कार्यालय पुणे, पुणे-१ तर्फे प्रतिनिधी श्रीमती सीमा होळकर<br>**जन माहिती अधिकारी तथा** उप विभागीय अधिकारी,<br>बारामती उपविभाग, बारामती, ता.बारामती,जि.पुणे श्री.नंदकुमार काटकर | |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.०४.०१.२००८ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.- |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि.२०.०२.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.- |
| ८ | माहिती -मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

जिल्हाधिकारी कार्यालयाकडून गट क्र.५० मध्ये विहिरींसाठी दिलेल्या आदेशांची प्रत न दिल्यामुळे अतिक्रमण करुन केल्या जाणाऱ्या भ्रष्टाचाराला पाठीशी घातले जात आहे, अशी तक्रार

अपीलकर्ता श्री.सिध्दार्थ भगवान बनसोडे यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपीलात व लेखी निवेदनाद्वारे केली आहे.

सन १९९४ मधील हे आदेश असून भाडेपट्ट्यांचा आदेश जिल्हाधिकारी कार्यालयाकडून देण्यात आला होता. श्री.ज्ञानदेव बाजीराव बाबर यांच्या संदर्भातील आदेशाची प्रत उपलब्ध झाली ती श्री.बनसोडे यांना देण्यात आली. परंतु श्री.शिवाजी सुरेश निंबाळकर व सौ.सुमती निंबाळकर यांना विहिरीसाठी दिलेल्या जागेबाबतच्या आदेशाची प्रत कामगार तलाठी, तहसीलदार बारामती, उपविभागीय अधिकारी, बारामती, जिल्हाधिकारी कार्यालय यांच्याकडेही उपलब्ध होऊ शकली नाही. त्यामुळे त्याच्या प्रती देता आल्या नाही, असे निवेदन जन माहिती अधिकारी तथा शिरस्तेदार, उपविभागीय अधिकारी बारामती.जि.पुणे श्री.जी.डी.कुंभार यांनी केले.

संबंधित कागदपत्रे 'ब' वर्गातील असल्यामुळे ३० वर्षांच्या कालावधीसाठी जतन करणे आवश्यक आहे, हे लक्षात घेता या कागदपत्रांचा १५ दिवसांत शोध घ्यावा व कागदपत्रे उपलब्ध होत नसल्यास महाराष्ट्र सार्वजनिक अभिलेख अधिनियम, २००५ नुसार संबंधितांवर फौजदारी गुन्हा नोंदवून पुढील कार्यवाही करावी, असे मौखिक आदेश सुनावणीच्या वेळी आयोगाने दिले. त्यानुसार उपविभागीय अधिकारी बारामती, यांनी संबंधितांना त्याबाबत विचारणा केली. मात्र पुढील कार्यवाही केलेली नाही. ही गंभीर बाब आहे. आयोगाच्या विचारणेनंतर विद्यमान उपविभागीय अधिकारी, बारामती उपविभाग, बारामती श्री.तुषार ठोंबरे यांनी दि.१८.१२.२००९ च्या पत्रान्वये आयोगाला अहवाल सादर केला. संबंधित आदेश प्राप्त होत नसल्याचे त्यात नमूद केले आहे. कागदपत्राच्या जतनाच्या वर्गवारीनुसार संबंधित कागदपत्रांबाबतची वस्तुस्थिती नेमकेपणाने स्पष्ट होणे आवश्यक आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य.

२. अपीलकर्ता श्री.सिध्दार्थ भगवान बनसोडे यांच्या मागणीनुसार श्री.शिवाजी सुरेश निंबाळकर व सौ.सुमती निंबाळकर मौजे पिंपळी, ता.बारामती, जि.पुणे यांना गट क्रमांक ५० मध्ये विहिरीसाठी जागा मंजूर करण्याबाबतच्या जिल्हाधिकारी,पुणे यांचा आदेश कागदपत्रांच्या

जतनाच्या वर्गवारीनुसार उपलब्ध नसल्यास संबंधितांवर महाराष्ट्र सार्वजनिक अभिलेख अधिनियम, २००५ अन्वये फौजदारी गुन्हा नोंदवून पुढील कार्यवाही अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हाधिकारी, पुणे जिल्हाधिकारी कार्यालय,पुणे-१ यांनी करावी. याबाबतचा अनुपालन अहवाल अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हाधिकारी, पुणे जिल्हाधिकारी कार्यालय,पुणे-१ यांनी दि.२०.०१.२०१० पर्यंत आयोगास सादर करावा.

पुणे
दिनांक : २८/१२/२००९

राज्य माहिती आयोग पुणे खंडपीठ

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे ४११ ००१

श्री. सुरेश भाऊसो आल्हाट — अपीलकर्ता
मु.पो. लवळे, ता. मुळशी, जि. पुणे

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, मुळशी, ता. मुळशी, जि. पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार, मुळशी, ता. मुळशी, जि. पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ६१८ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २७.११.२००८ |
| ३ | **उपस्थित**<br>**अपीलकर्ता** श्री. सुरेश भाऊसो आल्हाट, मु.पो. लवळे, ता. मुळशी, जि. पुणे<br>**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, मुळशी, ता. मुळशी, जि. पुणे श्री. संदेश रवींद्र शिर्के<br>**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार, मुळशी, ता. मुळशी, जि. पुणे श्री. विकास शरद भालेराव | |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २६.१०.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २८.११.२००६ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २६.१२.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ३१.१२.२००६ |
| ८ | माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

आपल्या जागेतून अन्य व्यक्तींना अधिकाऱ्यांनी आपल्या परवानगीशिवाय पाईपलाईन टाकू दिली, त्यामुळे आपले नुकसान होत असून त्याविरुध्द आपण केलेल्या अर्जाची प्रत आपण मागितली

होती. अर्जाची प्रत आपल्याकडे नसल्यामुळे व मुळशी तहसील कार्यालयातही ती आढळत नसल्याचे कळविल्यामुळे मूळ प्रश्न तसाच कायम राहिला आहे. संबंधित पाईपलाईन बेकायदेशीर असल्याचे पाटबंधारे खात्याने कळविले असूनही याबाबत कारवाई केली जात नाही, ती व्हावी, अशी मागणी अपीलकर्ता श्री. सुरेश भाऊसो आल्हाट यांनी केली.

श्री. आल्हाट यांनी दि. १.१.१९९६ ते ३०.९.२००६ या काळात स्वत:च केलेल्या अर्जांच्या प्रती मागितल्या आहेत. उपलब्ध माहिती तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, मुळशी श्री. हेमंत निकम यांनी संबंधित संकलनाकडून घेऊन श्री. आल्हाट यांना दिली, मात्र श्री. आल्हाट यांना हवा असलेला अर्ज वारंवार शोध घेऊनही उपलब्ध होऊ शकत नाही, त्यामुळे त्याची प्रत देता आली नाही. तथापि मूळ प्रश्नाबाबत श्री. आल्हाट यांनी आपल्याशी संपर्क साधल्यास योग्य ती कार्यवाही नियमानुसार करण्यात येईल, असे त्यांना त्याच वेळी कळविले होते. असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार श्री. विकास शरद भालेराव व अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, मुळशी श्री. संदेश रवींद्र शिर्के यांनी केले.

अपीलकर्ता श्री. आल्हाट यांनी मूळ प्रश्न नमूद करणारा स्वतंत्र अर्ज अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, मुळशी, जि. पुणे यांना सादर करावा व तत्कालीन निवासी नायब तहसीलदार, मुळशी व तहसीलदार यांनी या प्रश्नी केलेल्या कार्यवाहीच्या माहितीसह अर्जावरील पुढील कार्यवाहीचा अहवाल अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, मुळशी यांनी आयोगाला सादर करावा, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. असा अहवाल अद्याप अप्राप्त आहे, ही गंभीर बाब आहे. त्यामुळे आयोगाने संबंधितांना केलेल्या विचारणेनंतर तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, श्री. विकास शरद भालेराव यांनी अहवाल सादर करण्यास मुदत मागणारा अर्ज दि. १.१२.२००९ रोजी केला. त्यांची विनंती आयोगाने मान्य केली. विद्यमान जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, श्री. किशोर घाडगे यांनी दि.९.१२.२००९ च्या पत्रान्वये केवळ कागदपत्रांचे संकलन सादर केले असून मूळ कार्यवाहीबाबतचा तो अहवाल नाही. त्याबाबत त्यांना समज देण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

१. अपील अंशत: मान्य करण्यात येत आहे.

२. आयोगाने दिलेल्या मौखिक आदेशानुसार केलेल्या कार्यवाहीचा अहवाल तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार श्री. हेमंत निकम व अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार श्री. अविनाश शिंदे यांनी विलंबाबाबतच्या खुलाशासह दि. २५.१.२०१० पर्यंत आयोगाला सादर करावा. अन्यथा ते कारवाईस पात्र राहतील.

पुणे
दि. ३०.१२.२००९

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र * पुणे खंडपीठ *

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.संजय आण्णाप्पा कांबळे
मु.पो.रुकडी, ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, हातकणंगले,
ता. हातकणंगले, जि.कोल्हापूर उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार, हातकणंगले,
ता. हातकणंगले, जि.कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ६२३ / कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२४.६.२००९ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.संजय आण्णाप्पा कांबळे
मु.पो.रुकडी, ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, हातकणंगले,
ता. हातकणंगले, जि.कोल्हापूर श्री.समीर शिंगटे

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार, हातकणंगले,
ता. हातकणंगले, जि.कोल्हापूर श्री.रणजीत देसाई

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १७.११.२००६ व ३१.३.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १२.१२.२००६ व १३.७.२००६ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ११.६.२००७ व १९.४.२००७ |

| | | |
|---|---|---|
| ७ | अपिलीय प्राधिका-यांनी निर्णय दिल्याची तारीख | दि. १२.७.२००७ |
| ८ | माहिती-मागणीच्या अर्जाची (जोडपत्र अ) प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.२९.५.२००९ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांत एकमत न झाल्याने दि.२४.६.२००९ रोजी सुनावणी घेण्यात आली.

आपण तीन अर्जांद्वारे पुरवठा विभागासंबंधीने मागितलेली माहिती अपुरी, दिशाभूल करणारी व विलंबाने दिली. सहाय्यक जन माहिती अधिकारी तथा पुरवठा अव्वल कारकून, तहसील कार्यालय, हातकणंगले, ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर श्री.पी.एस.कोळी हे माहिती देत नाहीत व धमक्या देतात. त्याबाबत आपण जिल्हाधिकाऱ्यांकडे अर्जही केलेला आहे. श्री.कोळी गेली वीस वर्षे या तालुक्यात काम करतात व त्यांच्याविरुध्द अर्ज करणाऱ्यांना धमकावतात. राष्ट्रीय दलित महासंघाचा जिल्हाध्यक्ष म्हणून त्यांच्याविरूध्द संघटनेतर्फे आंदोलन केल्यानंतर त्यांनी आपल्याविरूध्द वेगवेगळया स्वरुपाचे आरोप करून आपल्याला गुंतविण्याचा प्रयत्न चालविला आहे. त्यांच्याविरूध्द भ्रष्टाचाराच्या अनेक तक्रारी असून त्यांची चौकशी झाली पाहिजे, अशी मागणी अपीलकर्ता श्री.संजय आण्णाप्पा कांबळे यांनी केली.

सहाय्यक जन माहिती अधिकारी तथा पुरवठा अव्वल कारकून, तहसील कार्यालय, हातकणंगले, ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर श्री.पी.एस.कोळी यांना आपण नोटीस दिली असून माहिती देण्याबाबत वेळोवेळी कल्पना दिली आहे, असे निवेदन अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, हातकणंगले श्री.समीर शिंगटे यांनी केले.

श्री.कांबळे हे हातकणंगले तालुका पुरवठा विभागाकडे विविध स्वरूपाची माहिती नेहमीच मागतात व अधिकाऱ्यांना ब्लॅकमेल करतात. रास्त धान्य दुकानदारांकडून रॉकेल, तांदूळ, गहू वगैरे वस्तू घेऊन नेहमीच पैसे देत नाहीत व तक्रारीची धमकी देऊन त्यांच्याकडून पैसे काढण्याचा प्रयत्न करतात, असे लेखी निवेदन हिंदमाता महिला ग्रामीण संस्था, कबनूर हातकणंगले तालुका (ग्रामीण)

रास्त भाव दुकान व किरकोळ रॉकेल विक्रेते संघटना, ता.हातकणंगले आदी संस्थांच्या वतीने देण्यात आले असल्याचे जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, हातकणंगले, ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर श्री.रणजीत देसाई व अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, हातकणंगले, ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर श्री.समीर शिंगटे यांनी निवेदनांच्या प्रतींसह नमूद केले. या सर्व तक्रारी खोट्या असून श्री.कोळी यांनी रचलेल्या षडयंत्राचा तो भाग आहे, असे लेखी निवेदन श्री.कांबळे यांनी दिले.

उभय बाजूंचे आरोप-प्रत्यारोप व तक्रारी पाहता सहाय्यक जन माहिती अधिकारी तथा पुरवठा अव्वल कारकून, तहसील कार्यालय, हातकणंगले, ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर श्री.पी.एस.कोळी यांनी लेखी निवेदन आयोगाला सादर करावे, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार श्री.कोळी यांनी दि.२०.७.२००९ च्या पत्रान्वये खुलासा सादर केला असून श्री.कांबळे यांच्यावर एजंट म्हणून काम करणे, अधिकाऱ्यांना ब्लॅकमेल करून पैसे उकळणे, रास्त भाव दुकानदारांना त्रास देणे आदि स्वरूपाचे आरोप केले आहेत.

उभय बाजूंची निवेदने लक्षात घेता माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अन्वये अपेक्षित असलेल्या माहितीविषयक कार्यवाहीपेक्षा व्यक्तिगत स्वरूपाच्या आरोप-प्रत्यारोपांवरच भर आहे. अशा आरोपांची शहानिशा करणे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मध्ये अपेक्षित व शक्य नाही. मात्र उभय बाजूतर्फे कोणीही माहितीच्या अधिकाराचा दुरूपयोग किंवा पायमल्ली केली असेल तर ते दखलपात्र ठरेल.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**पुणे**
**दि.२१.१२.२००९**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**